गृहप्रमुख, सामान्य राज्यसेवा, गट-ब

परीक्षा दि : 03/10/2010

# A

CODE ... P

प्रश्नपुस्तिका क्रमांक
BOOKLET NO.

10...

**प्रश्नपुस्तिका**

एकूण प्रश्न : ...

वेळ : दीड तास

## चाळणी परीक्षा / SCREENING TEST

एकूण गुण : 150

StudentBounty.com

## सूचना

(1) सदर प्रश्नपुस्तिकेत 150 अनिवार्य प्रश्न आहेत. उमेदवारांनी प्रश्नांची उत्तरे लिहिण्यास सुरुवात करण्यापूर्वी या प्रश्नपुस्तिकेत सर्व प्रश्न आहेत किंवा नाहीत याची खात्री करून घ्यावी. असा तसेच अन्य काही दोष आढळल्यास ही प्रश्नपुस्तिका समवेक्षकांकडून लगेच बदलून घ्यावी.

(2) आपला परीक्षा क्रमांक ह्या चौकोनांत **न विसरता बॉलपेनने** लिहावा.

| परीक्षा-क्रमांक | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | केंद्राची संकेताक्षरे | | | | | | | शेवटचा अंक |

(3) वर छापलेला प्रश्नपुस्तिका क्रमांक तुमच्या उत्तरपत्रिकेवर विशिष्ट जागी उत्तरपत्रिकेवरील सूचनेप्रमाणे **न विसरता नमूद करावा.**

(4) या प्रश्नपुस्तिकेतील प्रत्येक प्रश्नाला 4 पर्यायी उत्तरे सुचविली असून त्यांना 1, 2, 3 आणि 4 असे क्रमांक दिलेले आहेत. त्या चार उत्तरांपैकी सर्वात योग्य उत्तराचा क्रमांक उत्तरपत्रिकेवरील सूचनेप्रमाणे तुमच्या उत्तरपत्रिकेवर नमूद करावा. अशा प्रकारे उत्तरपत्रिकेवर उत्तरक्रमांक नमूद करताना तो संबंधित प्रश्नक्रमांकासमोर छायांकित करून दर्शविला जाईल याची काळजी घ्यावी, **ह्याकरिता फक्त काळ्या शाईचे बॉलपेन वापरावे, पेन्सिल वा शाईचे पेन वापरू नये.**

(5) सर्व प्रश्नांना समान गुण आहेत. यास्तव सर्व प्रश्नांची उत्तरे द्यावीत. घाईमुळे चुका होणार नाहीत याची दक्षता घेऊनच शक्य तितक्या वेगाने प्रश्न सोडवावेत. क्रमाने प्रश्न सोडविणे श्रेयस्कर आहे पण ***एखादा प्रश्न कठीण वाटल्यास त्यावर वेळ न घालविता पुढील प्रश्नाकडे वळावे.*** अशा प्रकारे शेवटच्या प्रश्नापर्यंत पोहोचल्यानंतर वेळ शिल्लक राहिल्यास कठीण म्हणून वगळलेल्या प्रश्नांकडे परतणे सोईस्कर ठरेल.

(6) उत्तरपत्रिकेत एकदा नमूद केलेले उत्तर खोडता येणार नाही. नमूद केलेले उत्तर खोडून नव्याने उत्तर दिल्यास ते तपासले जाणार नाही.

(7) **प्रस्तुत परीक्षेच्या उत्तरपत्रिकांचे मूल्यांकन करताना उमेदवाराच्या उत्तरपत्रिकेतील योग्य उत्तरांनाच गुण दिले जातील. तसेच "उमेदवाराने वस्तुनिष्ठ बहुपर्यायी स्वरूपाच्या प्रश्नांची अचूक उत्तरेच उत्तरपत्रिकेत नमूद करावीत. अन्यथा त्यांच्या उत्तरपत्रिकेत सोडविलेल्या प्रत्येक चार चुकीच्या उत्तरांसाठी एका प्रश्नाचे गुण वजा करण्यात येतील".**

(8) प्रश्नपुस्तिकेमध्ये विहित केलेल्या विशिष्ट जागीच कच्चे काम (रफ वर्क) करावे. प्रश्नपुस्तिकेव्यतिरिक्त उत्तरपत्रिकेवर वा इतर कागदावर कच्चे काम केल्यास ते कॉपी करण्याच्या उद्देशाने केले आहे, असे मानले जाईल व त्यानुसार उमेदवारावर शासनाने जारी केलेल्या "परीक्षांमध्ये होणाऱ्या गैरप्रकारांना प्रतिबंध करण्याबाबतचे अधिनियम-82" यातील तरतुदीनुसार कारवाई करण्यात येईल व दोषी व्यक्ती कमाल एक वर्षाच्या कारावासाच्या आणि/किंवा रुपये एक हजार रकमेच्या दंडाच्या शिक्षेस पात्र होईल.

**पर्यवेक्षकांच्या सूचनेविना हे सील उघडू नये**

## ताकीद

**ह्या प्रश्नपत्रिकेसाठी आयोगाने विहित केलेली वेळ संपेपर्यंत ही प्रश्नपुस्तिका आयोगाची मालमत्ता असून ती परीक्षाकक्षात उमेदवाराला परीक्षेसाठी वापरण्यास देण्यात येत आहे. ही वेळ संपेपर्यंत सदर प्रश्नपुस्तिकेची प्रत/प्रती, किंवा सदर प्रश्नपुस्तिकेतील काही आशय कोणत्याही स्वरूपात प्रत्यक्ष वा अप्रत्यक्षपणे कोणत्याही व्यक्तीस पुरविणे, तसेच प्रसिद्ध करणे हा गुन्हा असून अशी कृती करणाऱ्या व्यक्तीवर शासनाने जारी केलेल्या "परीक्षांमध्ये होणाऱ्या गैरप्रकारांना प्रतिबंध करण्याबाबतचा अधिनियम-82" यातील तरतुदीनुसार तसेच प्रचलित कायद्याच्या तरतुदीनुसार कारवाई करण्यात येईल व दोषी व्यक्ती कमाल एक वर्षाच्या कारावासाच्या आणि/किंवा रुपये एक हजार रकमेच्या दंडाच्या शिक्षेस पात्र होईल.**

**तसेच ह्या प्रश्नपत्रिकेसाठी विहित केलेली वेळ संपण्याआधी ही प्रश्नपुस्तिका अनधिकृतपणे बाळगणे हा सुद्धा गुन्हा असून तसे करणारी व्यक्ती आयोगाच्या कर्मचारीवृंदापैकी, तसेच परीक्षेच्या पर्यवेक्षकीयवृंदापैकी असली तरीही अशा व्यक्तीविरूद्ध उक्त अधिनियमानुसार कारवाई करण्यात येईल व दोषी व्यक्ती शिक्षेस पात्र होईल.**

**पुढील सूचना प्रश्नपुस्तिकेच्या अंतिम पृष्ठावर पहा**

www.StudentBounty.com

कच्च्या कामासाठी जागा / SPACE FOR ROUGH WORK

StudentBounty.com

www.StudentBounty.com

StudentBounty.com

1. कार्यकारणपूर्तीसाठी जास्तीत जास्त उचित पर्याय निवडा. अध्ययन करताना विद्यार्थ्याला स्वत:च्या रुचीचा शो घ्यायला प्रेरित करून त्या रुचीची पातळी बोधात्मक कृतिक्षमतेपर्यंत न्यायला साहाय्य देणे ही सुकरकाची (Facilitator) जबाबदारी आहे; कारण रुची घेऊन काम करणाऱ्या

   (1) व्यक्तीच्या निर्मितीचा दर्जा नेहमीच उत्तम असतो.

   (2) व्यक्तीला तणावाशिवाय निर्मितीचा दर्जा उच्च राखण्याच्या दृष्टीने कौशल्ये आत्मसात करणे शक्य होते.

   (3) व्यक्ती तणावाशिवाय समाजोपयोगी निर्मिती करतातच.

   (4) व्यक्तीला तिच्या निर्मितीसाठी समाजात सन्मान मिळतो.

---

2. एखाद्या कसोटीद्वारे ज्या क्षमतेचे मापन करावयाचे ठरविले असेल, त्या कसोटीद्वारे त्याच क्षमतेचे मापन अचुकपणे होत असेल तर ती कसोटी __________ आहे असे म्हणता येईल.

   (1) विश्वसनीय (2) पर्याप्त (3) सप्रमाण (4) पर्याप्त व विश्वसनीय

---

3. विधानपूर्तीसाठी जास्तीत जास्त योग्य पर्याय निवडा.

   अध्ययन प्रक्रिया व्यक्तीला .........

   (1) स्वत:च्या क्षमतांची व्याप्ती व खोली वाढविण्याच्या संधी उपलब्ध करते.

   (2) स्वत:साठी कायमस्वरूपी नोकरीची हमी, भरपूर मोबदला व प्रतिष्ठा उपलब्ध करते.

   (3) स्वत:च्या सामर्थ्याची गुणवत्ता वाढविणारी, दुबळेपणावर मात करण्याला उपयुक्त ठरणारी कौशल्ये प्राप्त करण्याच्या संधी उपलब्ध करते.

   (4) स्वत:च्या क्षमतांची गुणवत्ता वाढवून त्यांचा समाजासाठी उपयोग करण्याच्या संधी उपलब्ध करते.

---

4. जास्तीत जास्त पर्याय निवडून विधानपूर्ती करा.

   राष्ट्रीय मूल्यमापन व अधिस्वीकृती परिषदेचे मुख्य कार्य म्हणजे.....

   (1) संस्थेला स्वत:ची ध्येये व ती गाठण्यासाठी राबवलेली धोरणे यांचे स्वयं-मूल्यनिर्धारण करण्यासाठी साहाय्य देणे.

   (2) संस्थेने स्वत:ची ध्येये व ती गाठण्यासाठी केलेले उपक्रम याबाबत केलेले दावे सिद्ध करण्याच्या संधी उपलब्ध करणे.

   (3) संस्थेने स्वत:ची ध्येये व ती गाठण्यासाठी केलेले उपक्रम यांच्यातील सुसंगतीच्या आधारे श्रेणी प्रदान करणे.

   (4) संस्थेला स्वत:ची ध्येये व ती गाठण्यासाठी केलेण्या उपक्रमांबाबतच्या स्वयं-मूल्यनिर्धारणाच्या आधारे श्रेणी प्रदान करणे.

---

**कच्च्या कामासाठी जागा**



www.StudentBounty.com

5. वापरातील संज्ञा निवडा.

सुखदस्मृतींना उजाळा देण्याच्या प्रक्रियेसाठी मनोवैज्ञानिक कोणती संज्ञा वापरतात ?

(1) परागमन (2) दमन (3) समर्थन (4) प्रतिपूरण

---

6. वर्णन करणारा जास्तीत जास्त योग्य पर्याय निवडा.

प्रकल्प अध्ययन पद्धत : .....

(1) पर्याय (2), (3) व (4) योग्य

(2) व्यक्तीला विविध विद्याशाखांच्या एकात्मिक अध्ययनसंधी उपलब्ध करते.

(3) व्यक्तीसमूहातील सहभागींना व्यक्तिगत बुद्धिमत्ता कल व अध्ययनशैली यानुसार अध्ययन अवकाश उपलब्ध करते.

(4) अध्यापकाला विद्यार्थ्यांच्या वैयक्तिक व सामूहिक स्वरूपाच्या कार्य व निर्मिती प्रक्रियांचे मूल्यमापन करण्याच्या संधी उपलब्ध करते.

---

7. संप्रेषण पूर्ण होण्यासाठी __________ हे घटक आवश्यक आहेत.

(1) प्रत्याभरण, ग्राहक, माध्यम, प्रेषक, संकलन

(2) प्रेषक, संदेश, ग्राहक, प्रत्याभरण, अन्वय

(3) संदेश, प्रेषक, माध्यम, ग्राहक, प्रत्याभरण

(4) प्रेषक, संदेश, ग्राहक, सांकेतिकीकरण, प्रत्याभरण

---

8. विधानपूर्तीसाठी जास्तीत जास्त योग्य पर्याय निवडा.

ज्ञानाधिष्ठित समाज घडविण्याच्या दृष्टीने विकसित केलेल्या शिक्षणप्रणालीत ..........

(1) विद्यार्थ्यांची मूलभूत ज्ञानार्जन व ज्ञाननिर्मिती कौशल्ये विकसित करण्याला प्राधान्य दिले जाते.

(2) विद्यार्थ्यांनी विविध विद्याशाखांचा आशय प्राप्त करण्याला प्राधान्य दिले जाते.

(3) विद्यार्थ्यांना समूहाने व वैयक्तिकरीत्या कार्यरत राहून ज्ञानार्जन व ज्ञाननिर्मिती करण्यात सहभाग देण्याची कौशल्ये आत्मसात करण्याला प्राधान्य दिले जाते.

(4) विविध कलास्पर्धांद्वारे विद्यार्थ्यांना स्वत:च्या विविध गुणांचे प्रकटीकरण करण्याच्या संधी देण्याला प्राधान्य दिले जाते.

---

**कच्च्या कामासाठी जागा**

StudentBounty.com

www.StudentBounty.com

StudentBounty.com

**9.** विधानपूर्तीसाठी जास्तीत जास्त योग्य पर्याय निवडा.
अभ्यासक्रम ध्येये ही ..........

(1) व्यक्तीला समाजाचा एक जबाबदार ज्ञानकर्मी घटक म्हणून घडायला साहाय्य देण्याशी निगडित असतात.

(2) सर्वांना परीक्षा देणे सोपे जाण्याशी निगडित असतात.

(3) विद्यार्थ्यांच्या व्यक्तिगत बुद्‌धिमत्ता कलाशी व अध्ययन शैलींशी निगडित असतात.

(4) अध्यापकांना उपक्रम सहजपणे राबवता येण्याशी निगडित असतात.

---

**10.** जास्तीत जास्त योग्य गट ओळखा.

प्रत्येक व्यक्ती ही स्वत: जडण-घडणीदरम्यान सामावून घेतलेले व जिरवलेले अनुभव घेऊनच अध्ययन कृतीत सहभागी होते. यासाठी व्यक्ती अध्ययन प्रक्रियेच्या केंद्रस्थानी असली पाहिजे असा आग्रह धरणाऱ्या अध्यापन तज्ज्ञांचा गट.

(1) प्याजे, व्हायगॉत्स्की (2) स्किनर, ब्रुनर

(3) रॉजर्स, स्किनर (4) स्किनर, व्हॉयगॉत्स्की

---

**11.** कार्यात्मक व्याख्येत __________ महत्त्वाचे असते.

(1) उजळणी (2) संकल्पना निर्मिती (3) विश्वसनीयता (4) सप्रमाणता

---

**12.** $\text{mdn} = L + i\left[\frac{N/2 - F}{f}\right]$

वरील सूत्रात $i$ चा अर्थ काय ?

(1) मध्यांक ज्या वर्गांतरात येतो त्या वर्गांतराची वारंवारिता.

(2) ज्या वर्गांतरात मध्यांक आहे त्याची निचतम मर्यादा.

(3) वर्गांतर लांबी

(4) ज्या वर्गांतरात मध्यांक आहे त्या वर्गांतराच्या खालच्या वर्गांतरापर्यंतची संचयी वारंवारता.

---

**13.** दोन चल राशीतील संबंधाचे स्वरूप दर्शविणाऱ्या अचल अंकास __________ असे म्हणतात.

(1) केंद्रीय प्रवृत्ती (2) सहसंबंध गुणक (3) प्रमाणक (4) शततमक

---

**कच्च्या कामासाठी जागा**

P.T.O.

www.StudentBounty.com

StudentBounty.com

14. कोणत्याही समस्येचे, प्रश्नाचे, विषयांशाचे सर्वांनी मिळून केलेले सर्वांगीण विवेचन, विश्लेषण, मूल्यमा
_________ पद्धती होय.

(1) समालोचन (2) व्याख्यान (3) समवाय (4) चर्चा

---

15. सतत सर्वंकष मूल्यमापनासंदर्भातील कोणता विधानसंच जास्तीत जास्त योग्य आहे.

विधाने :

(A) हे मूल्यमापन व्यक्ती व व्यक्तिसमूहांना; ते करत असलेल्या निर्मिती प्रक्रिया व निर्मिती यांच्यासंदर्भात प्रत्याभरण करते.

(B) हे मूल्यमापन व्यक्ती व व्यक्तिसमूहांची गुणवत्ता ठरवून कोणाला पुढे जाऊ द्यायचे वा वगळायचे ते ठरविते.

(C) हे मूल्यमापन व्यक्ती व व्यक्ति समूहांना स्वत: करत असलेल्या निर्मिती प्रक्रिया व निर्मिती यांची गुणवत्ता ठरविण्याचे आवाहन करते.

(D) हे मूल्यमापन व्यक्ती व व्यक्तिसमूहांना परस्परांच्या निर्मिती प्रक्रिया व निर्मिती यांची गुणवत्ता निर्धारित करण्याच्या संधी उपलब्ध करते.

(1) A, B व C (2) A, C व D (3) B, C व D (4) सर्व विधाने

---

16. जास्तीत जास्त अचूक पारिभाषिक संज्ञा निवडा.
मराठी भाषेतील वाक्यरचना नियमांचा, इंग्रजी भाषा वाक्यरचना करण्यावर प्रतिकूल परिणाम होत असेल तर अशा स्वरूपाच्या अध्ययन संक्रमणाचे वर्णन मनोविज्ञानात कोणत्या विशेषणाने करतात ?

(1) ऋण (2) शून्य (3) धन (4) गैर

---

17. विधानपूर्तीसाठी जास्तीत जास्त योग्य पर्याय निवडा.

अध्यापन कार्यासाठी वैज्ञानिक पद्धतीने उपलब्ध केलेल्या ज्ञानाधारांची गरज आहे कारण ते अध्यापकाला विद्यार्थी व त्याचे संदर्भ, विशिष्ट विद्याशाखा व संबंधित ज्ञाननिर्मिती प्रक्रिया, अध्ययन व व्यक्तिमत्त्व विकास इत्यादी बाबत ..........

(1) विस्तृत माहिती देतात व अध्यापन तज्ज्ञ बनवितात.

(2) अंत:दृष्टी मिळवून तज्ज्ञ व्हायला साहाय्य देतात.

(3) विस्तृत माहिती देऊन संशोधन करण्याची प्रेरणा देतात.

(4) अंत:दृष्टी प्राप्त करून वेळोवेळी उचित निर्णय घेण्याबाबत साहाय्य करतात.

---

कच्च्या कामासाठी जागा

www.StudentBounty.com

StudentBounty.com

**पुढील उतारा वाचून 18 ते 22 क्रमांकाच्या प्रश्नांची उत्तरे लिहा.**

खरं तर अभ्यासक्रमातील सगळंच्या सगळं लक्षात ठेवण्याची गरज नसते. त्यातील बराचसा भाग हा केवळ अंदाजानं किंवा तर्कानं तुम्हाला सांगता येतो. काही भाग महत्त्वाचा नसल्यामुळं तो लक्षात ठेवण्याची गरज नसते. म्हणजे लक्षात ठेवण्याचा पाठ्यभाग खरं म्हणजे बराच कमी असतो. तुम्ही अभ्यास करताना धड्याचं नाव वाचता आणि लगेच वाचायला सुरुवात करता. त्याऐवजी धडयाचं नाव वाचल्यावर त्या नावावरून त्या धड्यात काय दिलं असेल याचा तर्क किंवा अंदाज बांधा. त्यानंतर धडा वाचायला सुरुवात करा. त्याचप्रमाणं धड्यामध्ये शीर्षकं व उपशीर्षकं दिलेली असतात. ती वाचल्यावरसुद्धा लगेच तो परिच्छेद वाचण्यास सुरुवात करू नका. त्या शीर्षकावरून किंवा उपशीर्षकावरून पुढे काय माहिती दिली असेल याचा अंदाज करा. यानंतर तो परिच्छेद वाचा. तुम्ही असा प्रयत्न केला तर तुम्हाला असं दिसून येईल की त्या धड्याात काय दिलंय त्यातील 30 ते 50 टक्के तुम्ही अंदाजानं सांगू शकता. यामुळं अभ्यासातील तुम्हाला जे लक्षात ठेवायचंय त्याचा जवळ जवळ निम्मा बोजा कमी होतो. काही वेळेला तर्कानं तुम्हाला जे कळलेलं असतं, ते पुस्तकात विशिष्ट भाषेत मांडलेलं असतं. पुस्तकातील विशिष्ट भाषेत तंतोतंतपणे सांगता आलं नाही म्हणजे तुम्हाला समजलं नाही हा तुमचा गैरसमज आहे. तो प्रथम दूर करा. तर्क करण्याच्या सरावानं तुमच्या आकलनात वाढ होते. सरावानं आणि हळूहळू पुस्तकातील विशिष्ट भाषेतही तुम्हाला सांगता येतं. अरे शिकणं म्हणजे तरी काय ? Correct guessing is learning. बरोबर अंदाज करणं म्हणजे शिकणं.

---

**18.** विधान पूर्तीसाठी जास्तीत जास्त योग्य पर्याय निवडा.

साहित्याच्या शीर्षकावरून अथवा त्यातील काही शब्दावरून त्या साहित्याविषयी अंदाज बांधणे आपल्याला शक्य होते कारण :

(1) त्या शब्दाचे सर्व अर्थ आपल्याला माहीत असतात.

(2) शब्द वाचताच त्यासंबंधीचे आपले अर्थ व अनुभव जागृत होतात.

(3) त्या शब्दाच्या अर्थसंदर्भात आपण अनुभव घेतलेले असतात.

(4) त्या शब्दातून सूचित होणऱ्या अर्थासंबंधी आपण त्यापूर्वी काही वाचलेले वा ऐकलेले असते.

---

**19.** जास्तीत जास्त योग्य पर्याय निवडून विधान पूर्ण करा.

अभ्यासक्रमातील (पाठ्यक्रमातील) सगळं लक्षात ठेवण्याची गरज नसते कारण ....

(1) सगळा भाग दैनंदिन जीवनात उपयोगी नसतो.

(2) सर्व भाग लक्षात ठेवणे मेंदूच्या आवाक्याबाहेरचे असते.

(3) तर्क-अंदाजाने बराचसा भाग आपल्या लक्षात रहातो.

(4) सर्व भाग परीक्षेत विचारला जात नाही.

---

**कच्च्या कामासाठी जागा**



www.StudentBounty.com

StudentBounty.com

**20.** साहित्याचे आकलन होण्यासाठी ते वाचायला सुरुवात करताना पुढीलपैकी कोणती कृती करणे जास्त यो

(1) त्या साहित्यासाठी परीक्षेत किती टक्के गुण राखून ठेवले आहेत हे पाहणे.

(2) त्या साहित्यावर परीक्षेत कोणत्या स्वरूपाचे प्रश्न विचारतात हे पाहाणे.

(3) साहित्याचा शब्द्-न्-शब्द वाचून नवीन शब्दांचे अर्थ कोशात पाहणे.

(4) त्या साहित्याच्या शीर्षकावरून त्यात काय दिलं असेल याचा अंदाज बांधणे.

---

**21.** विधानपूर्तीसाठी जास्तीत जास्त योग्य पर्याय निवडा.

जर साहित्याला शीर्षक नसेल तर _________.

(1) त्यावर नजर टाकून त्यातील काही शब्दांच्या आधारे तर्क बांधावा.

(2) तसे साहित्य वाचणे टाळावे म्हणजे वेळ वाया जाणार नाही.

(3) ते काळजीपूर्वक वाचून त्यातील महत्त्वाचे शब्द अधोरेखित करावेत.

(4) वरील सर्व कृती योग्य आहेत.

---

**22.** जास्तीत जास्त योग्य पर्याय निवडून विधानपूर्ती करा.

जर पुस्तकात मांडलेलं त्याच शब्दात तंतोतंत सांगता आलं नाही तर त्याचा अर्थ __________ असा होतो.

(1) ..... आपल्याला त्या साहित्याचे आकलन झालेले नाही .....

(2) ..... आपल्याला आकलन झालेले आहे परंतु लेखकाच्या भाषेवर वा विषयाच्या परिभाषेवर आपले प्रभुत्व नाही .....

(3) ..... त्या भाषेतील साहित्य स्वतंत्रपणे अभ्यासायला आपण पात्र नाही .....

(4) ..... अशा भाषेतील साहित्य वाचण्यात वेळ घालवणे मूर्खपणाचे आहे .....

---

**23.** वाक्यपूर्तीसाठी जास्तीत जास्त योग्य पर्याय निवडा.

संशोधन कार्य करताना आपण लेखनचौर्य करतो आहोत याचे भान अनेक संशोधकांना नसते कारण _________.

(1) बौद्धिक संपत्तीचे स्वामित्व ही संकल्पना त्यांना माहित नसते.

(2) स्वतः कधीही स्वतंत्रपणे लेखन केले नसल्याने बौद्धिक संपत्तीच्या स्वामित्वाचा त्यांना आदर वाटत नाहीं.

(3) ज्याचे श्रेय त्याला दिले पाहिजे ही वृत्ती नसते.

(4) वरील सर्व.

---

**कच्च्या कामासाठी जागा**

www.StudentBounty.com

StudentBounty.com

**24.** दोनापेक्षा अधिक मध्यमानातील फरकांचे परीक्षण करण्यासाठी खालीलपैकी कोणत्या परीक्षिकेचा उपयोग केला जातो ?

(1) F - परीक्षिका (2) $x^2$ - परीक्षिका (3) t - परीक्षिका (4) प्रसरण विश्लेषण

---

**25.** परिकल्पना म्हणजे __________.

(1) अनुभव, अभ्यास व तर्क या तिन्हीवर आधारित असे समस्येचे संभाव्य उत्तर.

(2) समस्येबाबत संशोधकाचा असलेला अपरिपक्व दृष्टिकोण.

(3) समस्येवर संशोधकाने काढलेला तोडगा.

(4) चलांमधील संबंधांचे विधान.

---

**पुढील उतारा वाचून 26 ते 30 क्रमांकाच्या प्रश्नांची उत्तरे लिहा.**

''संपत्तीचे प्रवाह'' या आपल्या निबंधामध्ये जॉन रस्किन या इंग्रज विचारवंताने लिहिले आहे-''सामाजिक अर्थशास्त्र (राष्ट्राचे अर्थशास्त्र) म्हणजे सुखकर व उपयुक्त वस्तू योग्य वेळी व योग्य स्थळी कशा निर्माण कराव्यात आणि त्यांची विभागणी न्याय्य रीतीने कशी करावी यासंबंधीचे शास्त्र होय.'' या विचाराचे स्पष्टीकरण करताना रस्किन यांनी लिहिले आहे- ''आपल्या पिकाची योग्य वेळी कापणी करणारा शेतकरी, जहाजे बांधणारा सुतार, उत्तम विटा बनविणारा गवंडी, स्वयंपाक घर सांभाळणारी गृहिणी आणि आपला गळा सांभाळून सुस्वर गाणारी गायिका हे राष्ट्राच्या संपत्तीत व हितात सतत भर टाकीत असतात.'' रस्किन यांनी व्यापारी अर्थशास्त्रावर टीका करताना लिहिले आहे- 'व्यापारी अर्थशास्त्र हे पैसे संपादण्याचे शास्त्र आहे. त्यामुळे इतरांचे श्रम विकत घेण्याची सत्ता काही व्यक्तींच्या हाती येते आणि त्यामुळे एका पक्षास संपत्ती व सत्ता प्राप्त होते आणि दुसऱ्या बाजूला कष्ट करणाऱ्या पक्षाला दैन्य भोगावे लागते.' रस्किन यांनी म्हटले आहे, की श्रीमंत होणे म्हणजेच कमालीची विषमता निर्माण करण्याची कला आहे. त्यांनी लिहिले आहे- 'दुसऱ्यांच्या श्रमांवर हक्क निर्माण करणारी व्यापारी संपत्ती समाजात दिसू लागली याचा अर्थ, खऱ्या गरजूंना उपयुक्त व आवश्यक अशा संपत्तीची तेथे वाण पडली असा होतो.' खऱ्या संपत्तीमुळे राष्ट्रात भरदार छातीचे, पाणीदार डोळ्यांचे आणि उल्हासित अंत:करणाचे असंख्य लोक निर्माण होतात... राष्ट्रातील सर्व कारखान्यांत उत्कृष्ट प्रतीचे आत्मे निर्माण करणारा कारखानाच अधिक किफायतशीर होईल.'

---

**26.** जास्तीत जास्त उचित पर्याय निवडून वाक्य पूर्ण करा.

श्रम विकत घेण्याची सत्ता काहींना प्राप्त झाली की श्रम करणाऱ्यांना दैन्यावस्था भोगावी लागते याचे उत्तम उदाहरण म्हणजे ..........

(1) शेतकऱ्यांच्या वाट्याला येणारी दैन्यावस्था होय.

(2) शेती व्यवसायात गुंतलेल्या बांधवांना स्वत:च्या श्रमाचा वाजवी मोबदला न मिळणे होय.

(3) सतत पगारवाढ घेत त्या जोरावर संपत्ती एकवटणारे सरकारी नोकर व लोकप्रतिनिधी व श्रम करुन मूलभूत गरजाही न मिळवू शकणारी जनता होय.

(4) सर्वच असंघटित कष्टकऱ्यांच्या वाट्याला येणारी दैन्यावस्था होय.

---

कच्च्या कामासाठी जागा



www.StudentBounty.com

StudentBounty.com



**27.** जास्तीत जास्त योग्य पर्याय निवडा.

घर सांभाळणारी गृहिणी राष्ट्राच्या संपत्तीत व हितात भर टाकते कारण ..........

(1) ती कामाच्या ठिकाणी जाऊन गरजूंची जागा अडवत नाही.

(2) ती कुटुंबियांसाठी योग्य वेळी, गरजेनुसार योग्य प्रकारची सेवा देते व त्यामुळे कुटुंबीय उत्पादनात उच्च दर्जाचा सहभाग देतात.

(3) ती स्वत:च्या इच्छा व आकांक्षा बाजूला ठेवून कुटुंबियांची सेवा करते.

(4) ती कुटुंबियांसाठी राबून एकप्रकारे संपत्तीची बचत करते व कुटुंबियांची संपत्ती वाढविते.

---

**28.** विधानपूर्ति करण्यासाठी जास्तीत जास्त योग्य पर्याय निवडा.

जॉन रस्किन यांच्या मते सामाजिक अर्थशास्त्र म्हणजे .........

(1) चैनीच्या व दैनंदिन गरजेच्या वस्तू योग्य वेळी व योग्य स्थळी निर्माण करुन त्यांचे सर्वांना गरजेनुसार वाटप करण्याचे शास्त्र होय.

(2) जेव्हा गरज आहे; जेथे गरज आहे; ती भागविण्यासाठी योग्य अशा वस्तूंची निर्मिती करुन त्यांचे सर्वांना आवश्यकतेनुसार वाटप करण्याचे शास्त्र आहे.

(3) आरामात जगता येण्यासाठी आवश्यक अशा वस्तूंची गरजेनुसार निर्मिती करून त्यांचे सर्वांना वाटप करण्याचे शास्त्र होय.

(4) सुख देणाऱ्या वस्तूंची भरपूर प्रमाणात निर्मिती करुन कोणालाही वाण पडणार नाही हे पाहण्याचे शास्त्र आहे.

---

**29.** जास्तीत जास्त योग्य पर्याय निवडा.

गांधीजींच्या विचारांवर रस्किन यांच्या विचारांचा प्रभाव होता असे स्पष्ट दिसते कारण ..........

(1) उत्पादक शारीरिक श्रमांना प्रतिष्ठा असली पाहिजे हा गांधीजींचा आग्रह होता.

(2) अर्थव्यवस्थेमध्ये समाजातील सर्व घटकांचे सहकार्य असले पाहिजे व कोणाचेही शोषण होता कामा नये ही गांधीजींची भूमिका होती.

(3) सर्व लोकांच्या किमान गरजा पूर्ण करण्याला आवश्यक संपत्ती देशात आहे असे गांधीजींचे सांगणे होते.

(4) (1), (2), व (3) ही सर्व कारणे योग्य.

---

**30.** वाक्यपूर्तीसाठी जास्तीत जास्त उचित पर्याय निवडा.

दुसऱ्यांच्या शारीरिक श्रमांना कवडीमोलाने विकत घेणारी संपत्ती म्हणजे .........

(1) समाजाच्या आर्थिक उन्नतीचे लक्षण आहे.

(2) समाजाच्या आर्थिक अवनितीचे लक्षण आहे.

(3) समाजाच्या खऱ्या गरजूंना आवश्यक संपत्ती मिळत नसल्याचे लक्षण आहे.

(4) समाजात कमालीची विषमता असल्याचे लक्षण आहे.


---


**कच्च्या कामासाठी जागा**


www.StudentBounty.com


StudentBounty.com

**31.** पुढील संचातील कोणती आकृती विसंगत आहे ?

(1) 


(2) 

(3) 

(4) 

---

**32.** खालील आकृतीत प्रश्नचिन्हाच्या जागी कोणते अक्षर येईल ?




(1) O (2) A (3) D (4) N

---

**33.** चिपको आंदोलनाचे नेतृत्व कुणी केले ?

(1) श्रीमती गौरादेवी (2) श्री सुंदरलाल बहुगुणा

(3) मेधा पाटकर (4) बाबा आमटे

---

**34.** बॅसिलरी डिसेन्ट्री (आव) खालीलपैकी एका सूक्ष्म जिवाणूंमुळे होते.

(1) साल्मोनेला (2) अ‍ॅन्टेमोबिक हिस्टेलिटिका

(3) शिगिला बॅसिलस (4) स्ट्रेप्टोकोकाय

---

**35.** नेटवर्कमध्ये अनेक लहान संगणक एका मध्यवर्ती संगणकाबरोबर सरळ जोडण्यात येतात अशा नेटवर्कला __________ म्हणतात.

(1) स्टार नेटवर्क (2) बस नेटवर्क (3) रिंग नेटवर्क (4) वरील पैकी सर्व

---

कच्च्या कामासाठी जागा



www.StudentBounty.com

StudentBounty.com



**36.** जागतिक स्तरावरुन अक्षय-विकासाचा आग्रह धरण्याचे कारण .........

(1) यातून पर्यावरणाचा वाजवी उपयोग करुन घेतानाच त्याचे योग्य प्रकारे संवर्धन होईल हे पाहिले जाते.

(2) यात क्षयी नैसर्गिक साधन-संपत्ती वापरली जाणार नाही हे पाहिले जाते.

(3) यात क्षयी नैसर्गिक साधनसंपत्तीला पर्याय शोधण्यावरच भर दिला जातो.

(4) वरील सर्व

---


**37.** नोबेल पुरस्कार व पद्मविभूषण पुरस्काराने सन्मानित डॉ. नॉर्मन बोरलॉग हे प्रतिभावान व्यक्तिमत्व कोणत्या क्षेत्राशी संबंधित होते ?


(1) अवकाश (2) अणूतंत्रज्ञान (3) अंतराळ संशोधन (4) कृषी


---


**38.** खालील पर्यायामधील कोणती वेन आकृती पुढील समूहातील संबंध अचूक दर्शविते ?

स्त्री, सुशिक्षित, नागरिक

(1) 

(2) 

(3) 

(4) 

---

**39.** शासकीय कर्मचाऱ्याच्या बाबतीत __________ ही बाब ''शिक्षा'' या सदरात समाविष्ट होत नाही.

(1) ठपका ठेवणे (2) निलंबन करणे

(3) वेतनवाढ रोखून ठेवणे (4) पदोन्नती रोखून धरणे

---

**40.** राष्ट्रीय शालेय भोजन नियमात नमूद केल्यानुसार पेय म्हणून कोणत्या गोष्टीचा समावेश असावा ?

(1) 1 कप चहा (2) 1/2 ग्लास संपूर्ण दूध

(3) 1 कप उसाचा रस (4) 1 कप टोमॅटो सुप

---

**कच्च्या कामासाठी जागा**

www.StudentBounty.com

StudentBounty.com

**41.** कोल्हापूर संस्थानामध्ये स्त्रियांच्या पुनर्विवाह नोंदणी संबंधीचा कायदा 1917 साली कोणी केला ?

(1) महाराजा सयाजीराव गायकवाड (2) छत्रपती शाहू महाराज

(3) महर्षि धोंडो केशव कर्वे (4) असा कायदा झालाच नव्हता

---

**42.** डॉ जया अरूणाचलम यांना जमनालाल बजाज फांऊडेशन पुरस्कार 2009 पुढील कार्यामुळे प्राप्त झाला.

(1) आदीवासी भागात गुन्हेगारी रोखणे (2) विज्ञान तंत्रज्ञान सहाय्याने ग्रामीण विकास करणे

(3) महिला व मुलांच्या कल्याणासाठी कार्य (4) महात्मा गांधींचा विचार भारताबाहेर पोहचवणे

---

**43.** जगात सर्वात जास्त कोळशाचे साठे खालीलपैकी कोणत्या देशात आहेत ?

(1) भारत (2) पोलंड

(3) फ्रान्स (4) अमेरिकी संयुक्त संस्थाने

---

**44.** सध्या भारताचे वाणिज्य व औद्योगिक केंद्रिय मंत्री कोण आहेत ?

(1) आनंद शर्मा (2) जयपाल रेड्डी (3) फारूक अब्दुल्ला (4) मुकुल वासनिक

---

**45.** सांख्यिकीय व प्रशासकीय कामांसाठी __________ या कार्यक्रमांचा वापर केला जातो.

(1) एम.एस. एक्सेल (2) एम.एस. वर्ड (3) एम.एस. पॉवरपॉईंट (4) विंडोज एक्सप्लोर

---

**46.** ध्वनीचे मापन __________ मध्ये करतात.

(1) नॅनो मीटर (2) सेंटी मीटर (3) डेसीबल (4) डेसीमीटर

---

**47.** एका परीक्षेत विद्यार्थ्याने 25 प्रश्न सोडविले. बरोबर आलेल्या उत्तराकरिता 5 गुण मिळतात; व चुकलेल्या प्रत्येक उत्तराकरिता मिळालेल्या गुणांमधून 2 गुण कापले जातात. या परीक्षेत त्याला 76 गुण मिलले. तर त्याच्या चुकलेल्या प्रश्नांची संख्या किती ?

(1) 6 (2) 7 (3) 8 (4) 9

---

**कच्च्या कामासाठी जागा**



www.StudentBounty.com

StudentBounty.com



48. मादक पदार्थाचे अतिसेवन केल्यास __________ निर्माण होते.

(1) तरतरी (2) अस्वस्थता (3) हास्य (4) भ्रमोत्पदकता

---

49. खालील वित्तिय प्रकाशन वित्त विभागाकडून तयार करण्यात येत नाही.

(1) ग्रीन बुक (Green Book) (2) यलो बुक (Yellow Book)

(3) व्हाइट बुक (White Book) (4) ब्ल्यू बुक (Blue Book)

---

50. जागतिक पर्यावरण दिन __________ रोजी साजरा केला जातो.

(1) 5 जानेवारी (2) 5 जून (3) 14 फेब्रुवारी (4) 15 जानेवारी

---

51. रिकाम्या जागेसाठी जास्तीत जास्त उचित पर्याय निवडा.

एखाद्या घटनेविषयी, संस्थेविषयी वा काळाविषयी लिहून ठेवलेली माहिती ही तुलनेने __________ असणारी आधारसामग्री असते.

(1) प्राथमिक व उच्च सप्रमाणता (2) दुय्यम व उच्च सप्रमाणता

(3) दुय्यम व निम्न सप्रमाणता (4) प्राथमिक व निम्न सप्रमाणता

---

52. उचित पर्याय निवडा.

अमूर्त पातळीवरील आशय संघटकाच्या विविध पैलूंचे अर्थपूर्ण संघटन करण्याच्या बोधात्मक क्षमतेचा विकास हे कोणत्या प्रतिमानाचे ध्येय आहे.

(1) अग्रत संघटक (2) संबोध प्राप्ती (3) उद्‌गमन विचार (4) पृच्छा प्रशिक्षण

---

53. कस्तुरबा गांधी बालिका विद्यालय खालील शैक्षणिकदृष्ट्या मागासलेल्या गटात सुरु करण्यात येते.

(1) ज्या गटात मुलींच्या शिक्षणाचे प्रमाण 50% पेक्षा कमी आहे.

(2) ज्या गटात मुलींच्या शिक्षणातील गळतीचे प्रमाण 50% पेक्षा जास्त आहे व मुले आणि मुली यांच्या गळतीमधील फरक राष्ट्रीय सरासरीपेक्षा जास्त आहे.

(3) ज्या गटात स्त्री साक्षरता राष्ट्राच्या सरासरीपेक्षा कमी व स्त्री-पुरुष यांच्या साक्षरतेमधील फरक राष्ट्राच्या सरासरीपेक्षा जास्त आहे.

(4) ज्या गटात मुलींच्या शिक्षणासाठी एकही शाळा अस्तित्वात नाही.

---

**कच्च्या कामासाठी जागा**

www.StudentBounty.com

StudentBounty.com

54. जास्तीत जास्त उचित पर्याय निवडा.

परिणामकारक संप्रेषण हे निश्चितपणे __________ असायला हवे.

(1) बहुमार्गी, ताठर (2) एकमार्गी, ताठर

(3) बहुमार्गी, गतिमान (4) एकमार्गी, गतिमान

---

55. भुतानचे नवे राजे म्हणून कोणाची निवड झाली आहे ?

(1) जिग्मे सिंगे वांगचूक (2) जिग्मे खेसर नामग्याल वांगचूक

(3) ल्योंपो खांडू वांगचूक (4) जिग्मे च्युआंग वांगचूक

---

56. अलिप्त राष्ट्र चळवळीची (नाम) पंधरावी शिखर परिषद जुलै 2009 मध्ये __________ या देशात संपन्न झाली.

(1) कोपेनहेगेन (2) इजिप्त (3) चीन (4) फिलिपिन्स

---

57. खालील कोणत्या गोष्टीमुळे जमिनीचे निरूपयोगी क्षेत्र वाढले आहे.

(1) सतत पडणाऱ्या दुष्काळामुळे





(2) अमर्याद जंगल तोडीमुळे

(3) मातीची धूप झाल्याने व भूमिपातामुळे

(4) सागराचे पाणी शेती योग्य जमिनीत घुसल्यामुळे

---

58. विसंगत आकृति ओळखा.

(1)  (2)  (3)  (4) 

---

59. शासनाच्या कामकाजातील पत्र-व्यवहारासाठी ई-मेल सुविधेचा वापर पुढीलपैकी कोणत्या बाबासाठी उपयुक्त नाही ?

(1) प्रशासनाच्या सर्व स्तरावर माहिती तंत्रज्ञानाचा पुरेपुर वापर करुन शासकीय कामकाजाची कार्यक्षमता वाढविणे.

(2) विभागातील अधिकारी/कर्मचारी यांना संगणकाची अद्यावत माहिती उपलब्ध करुन देणे.

(3) जनतेस सत्वर सेवा उपलब्ध करुन देणे.

(4) मनुष्यबळ, वेळ व पैशाचा सतत होणारा अपव्यय टाळणे.

---

**कच्च्या कामासाठी जागा**

**P.T.O.**

www.StudentBounty.com

StudentBounty.com



60. दुसरे जागतिक मराठी साहित्य सम्मेलन __________ येथे झाले.

(1) कैरो (2) दुबई (3) कराची (4) कुवैत

61. सध्या अणुऊर्जा आयोगाचे अध्यक्ष म्हणून कोण कार्यरत आहेत ?

(1) डॉ. श्रीकुमार बॅनर्जी (2) डॉ. अनिल काकोडकर

(3) डॉ. ए.पी.जे. अब्दुल कलाम (4) यापैकी कोणीही नाही

62. शिक्षक वर्गात संगणकाच्या आधारे हृदयाची रचना व्हिडीओ क्लीपच्या माध्यमातून दाखवितात. यातील मृदुसाहित्य कोणते आहे ?

(1) व्हिडीओ क्लिप वरुन विद्यार्थ्यांना पाहण्यास मिळणारी कार्यरचना

(2) संगणक व त्याचा कळफलक

(3) संगणक व व्हिडीओ क्लीप

(4) वरीलपैकी कोणतेही नाही

63. विद्यापीठाचे पदसिद्ध कुलपती कोण असतात ?

(1) मुख्यमंत्री (2) राज्यपाल (3) राष्ट्रपती (4) कुलगुरु

64. 'जागतिक तापमानवाढ' ही संकल्पना सर्वप्रथम जनमानसात कोणी रूजवली ?

(1) वॅलेस ब्रोकर (2) डॉ. राजेंद्र पचौरी (3) पॉल क्रुगमन (4) विल्यम गॉउड

65. विद्यार्थ्याच्या आजारपणामुळे त्याला चिंता वाटते, त्यामुळे संप्रेषणात अडथळा निर्माण होतो.

वरील उदाहरणात कोणत्या प्रकारचा अडथळा निर्माण होतो ?

(1) पार्श्वभूमी-कायिक (काया $\rightarrow$ शरीर) (2) माध्यम-कायिक

(3) मनोकायिक (4) भौतिक-कायिक

कच्च्या कामासाठी जागा

www.StudentBounty.com

StudentBounty.com

**66.** उचित पर्याय निवडा.

हृदयाचे कार्य स्पष्ट व्हावे यासाठी अध्यापकाने एक संगणकीय खेळ रचला. अशुद्ध रक्ताचा हृदयात प्रवेश होऊन; त्याचे शुद्धीकरण होऊन; ते हृदयाकडून शरीराकडे जाईपर्यंतच्या सर्व घटनांची क्रमवार विभागणी करुन; विद्यार्थी या सर्व घटना सूचनांनुसार क्रिया करून अनुभवेल अशी यात योजना आहे. रक्तप्रवाहाबरोबर जाताना विद्यार्थ्याला माहितीच्या आधारे निर्णय घेऊन खेळी खेळायची आहे. योग्य निर्णयावर क्लिक केल्यावर पुढची चाल मिळते.

हा खेळ रचताना अध्यापकाने विद्यार्थ्याकडे कोणत्या दृष्टिकोनातून पाहिले आहे ?

(1) स्व-प्रत्याभरण प्रणाली (2) ज्ञानरचनाक्षम प्रणाली
(3) विचारक्षम प्रणाली (4) वरील सर्व

---

**67.** कुख्यात पाकिस्तानी दहशतवादी अजमल अमीर कसाबला कोणत्या न्यायाधिशाने शिक्षा सुनावली ?

(1) न्या. श्रीकृष्ण (2) न्या. एम.एल. टाहलियानी
(3) न्या. धर्माधिकारी (4) न्या. सावंत

---

**68.** जास्तीत जास्त उचित पर्याय निवडा.

जगाच्या विविध भागातील लोकांचे व्यक्तिगत संगणक आंतरजालाच्या (internet) सुविधेने परस्परांशी जोडले आहेत. यामुळे तयार झालेल्या सामाजिक सेतुजालाच्या फायद्यांचे स्वरूप काय आहे ?

(1) आंतर व्यक्तिक संवादात वाढ
(2) अनेक विधायक कामांसाठी दबावगटांची निर्मिती
(3) अनेकांना स्वतंत्रपणे ज्ञानार्जनाच्या संधी.
(4) वरील सर्व

---

**69.** राष्ट्रीय शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण संस्थेचे (NCERT) __________ हे पद्सिद्ध अध्यक्ष असतात.

(1) मानवी संसाधन खात्याचे मंत्री (2) राज्यांचे उच्च शिक्षणमंत्री
(3) विद्यापीठ अनुदान मंडळाचे अध्यक्ष (4) संस्थेचे सचिव

---

**70.** कोणता पर्याय उचित **नाही** ?

इ-मेल सुविधेचा उपयोग करणे अनेकांना सोयीचे वाटते कारण .....

(1) कमी वेळात संदेश वहन होते.
(2) बहुमाध्यम संदेश देता येतो.
(3) काटेकारेपणे लेखन-नियम वापरण्याची आवश्यकता नसते.
(4) संदेश आदान-प्रदान सहजपजे साठवता येते.

---

**कच्च्या कामासाठी जागा**



www.StudentBounty.com

StudentBounty.com



**71.** कोणता पर्याय अत्यावश्यक नाही.

आज शिक्षकी पेशा हा व्यवसाय बनला असून या व्यवसायात व्यक्तीला स्वत:चे स्थान निश्चित करायचे झाल्यास __________ आवश्यक आहे.

(1) सतत शिकते रहाणे; नव्या क्षमता आत्मसात करणे.

(2) विद्यार्थ्यांप्रती तदनुभूती व समाजाप्रती बांधलिकी जोपासणे.

(3) स्वत:च्या कामाचे प्रदर्शन मांडून जास्तीत जास्त पारितोषिके मिळवणे.

(4) स्वत:च्या कार्याबाबत सतत विमर्शी चिंतन करणे.

---

**72.** एखाद्या घटनेचा गृहीत परिणाम किंवा कारण म्हणजे __________ होय.

(1) आश्रयी चल (2) बाह्य चल (3) स्वाश्रयी चल (4) स्वतंत्र चल

---

**73.** जास्तीत जास्त उचित पर्याय निवडा.

गुणवत्ता शोध घेण्याच्या दृष्टीने घेण्याच्या मुलाखतीचे पुढीलपैकी कोणते स्वरूप असणे आवश्यक आहे ?

(1) असंरचित, सखोल व मुक्त (2) संरचित, उथळ व मुक्त

(3) असंरचित, उथळ व बंदिस्त (4) संरचित, सखोल व बंदिस्त

---

**74.** जे संगणक माहिती दुसऱ्या संगणकाकडे वळवितात, त्यांना __________ म्हणतात.

(1) टोपॉलॉजी (2) होस्ट (3) राऊटर्स (4) बॅकबोन्स

---

**75.** मिळालेल्या फलितांच्या कारणांची चर्चा __________ करणे योग्य ठरेल.

(1) निष्कर्षात (2) शिफारशीत (3) अर्थनिर्वचनात (4) निरीक्षणात

---

**76.** मानसशास्त्रीय क्षेत्रातील मनोविश्लेषात्मक उपपत्तीचा जनक __________ आहे.

(1) सिग्मंड फ्रॉईड (2) गेसेल (3) पियाजे (4) एरिकसन

---

**77.** पंकज अडवाणी कोणत्या खेळाशी संबंधित आहे ?

(1) बिलियर्डस् (2) हॉकी (3) टेनीस (4) क्रिकेट

---

**कच्च्या कामासाठी जागा**

www.StudentBounty.com

StudentBounty.com

78. 'नॅशनल डेअरी रिसर्च इन्स्टिट्यूट' (NDRI) हरियाणा येथील वैज्ञानिकांनी जून 2009 मध्ये 'गरीमा' ________ क्लोनद्वारे तयार केले.

(1) गायीचे वासरू (2) म्हशीचे पिल्लू (3) बकरीचे पिल्लू (4) कोंबडीचे पिल्लू

---

79. "एमिल" या पुस्तकाचे लेखक कोण आहेत ?

(1) पेस्टॉलाजी (2) जीन जेकस रुसो (3) जॉन ड्युई (4) हर्बर्ट स्पेन्सर

---

80. शिक्षणात मूलोद्योग हा विषय असावा अशी संकल्पना ________ यांनी मांडली.

(1) महात्मा गांधी (2) महात्मा जोतिबा फुले

(3) कर्मवीर भाऊराव पाटील (4) गुरुदेव रविंद्रनाथ टागोर

---

81. V W X Y Z हे पाच मित्र आहेत V X Z यांना आंबा आवडतो. W X Y यांना सफरचंद आवडते. V W Z यांना केळी आवडतात W X Z यांना द्राक्षे आवडतात. V Y यांना बोरे आवडतात. तर फक्त दोनच फळे आवडणारी व्यक्ती कोण ?

(1) V (2) W (3) X (4) Y

---

82. संप्रेषण प्रक्रियेत माध्यमाचा व्यक्तीवर ________ परिणाम होतो.

(1) मानसिक (2) बोधात्मक (3) आकलनात्मक (4) भावनिक

---

83. मुंबई राज्यात मागासवर्गीय मुलांसाठी पहिले शासकीय वसतिगृह ________ या वर्षी सुरु करण्यात आले.

(1) सन् 1920 (2) सन् 1922 (3) सन् 1925 (4) सन् 1926

---

84. तीन माणसे एका वाहनाने प्रवास करत होती. प्रत्येक जकातनाक्याला त्यांना माणशी 10 रु. कर आकारला जातो. 10 व्या टोलनाक्यानंतर एकजण वाहनातून उतरुन गेला. 20 व्या टोलनाक्यानंतर दुसरा उतरुन गेला. 22 व्या नाक्यानंतर वाहनचालकाचा प्रवास संपला. जर वाहनचालकाने सर्व कर भरला असेल तर संपूर्ण प्रवासात त्याने एकूण किती जकात कर दिला ?

(1) रु. 22/- (2) रु. 220/- (3) रु. 520/- (4) रु. 720/-

---

**कच्च्या कामासाठी जागा**



www.StudentBounty.com

StudentBounty.com



85. अनुमानात्मक संख्याशास्त्राच्या आधारे ..........

(1) निवडलेल्या नमुन्यावरुन संपूर्ण जनसंख्येच्या संबंधात निष्कर्ष काढता येतात.

(2) निवडलेल्या नमुन्यापुरतेच निष्कर्ष काढता येतात.

(3) निवडलेल्या जनसंख्येच्या विभाजनाच्या गुणवैशिष्ट्यांवरुन निष्कर्ष काढता येतात.

(4) निवडलेल्या नमुन्यातील काही ठराविक जनसंख्येच्या संबंधात निष्कर्ष काढता येतात.

---

86. राष्ट्रीय लोकशाही आघाडीचे कार्यकारी अध्यक्ष म्हणून कोणाची निवड करण्यात आली आहे ?

(1) लालकृष्ण अडवाणी (2) शरद यादव

(3) नितीन गडकरी (4) सुषमा स्वराज

---

87. महाराष्ट्र शासनाने सन् 2006-07 या वर्षापासून ''दलितवस्ती विकास व सुधारणा अभियान'' याची कोणाच्या नावाने सुरुवात केली आहे ?

(1) महात्मा गांधी, महात्मा फुले, डॉ. आंबडेकर (2) डॉ. आंबडेकर, महात्मा फुले, गाडगे महाराज

(3) शाहू, फुले, आंबेडकर (4) गाडगे महाराज, शाहू, फुले

---

88. विद्यापीठ अनुदान आयोग (U.G.C.) केव्हा स्थापन झाला ?

(1) 1921 (2) 1953 (3) 1948 (4) 1956

---

89. कोणत्या तारखेपासून महाविद्यालयाला सुट्टी लागणार आहे. पुन्हा आरंभ केव्हा होणार आहे. या सारख्या सूचना देणे म्हणजे __________ स्वरुपाचे संप्रेषण होय.

(1) तांत्रिक (2) प्रथायुक्त (3) अधिकृत (4) कृती

---

90. व्यक्तिमत्व विकासाकरीता फ्राईड यांनी कोणत्या अवस्था सांगितलेल्या आहेत ?

(1) बाह्य, कुमार, प्रौढ, व वृद्धावस्था

(2) मौखिक, उत्सर्जन, लैंगिक व सुप्तकाळ पुनरुत्पादकावस्था

(3) गर्भ, पौगंड, सुप्त व वृद्धावस्था

(4) वर नमूद (2) व (3) बरोबर आहे.

---

**कच्च्या कामासाठी जागा**

www.StudentBounty.com

StudentBounty.com

**91.** ''वेश्याव्यवसायातील 43% मुली या अल्पवयीन असतानाच या धंद्यात त्यांना प्रवेश करावा लागतो. ह्याचे प्रमुख कारण म्हणजे __________ होय'' असे राष्ट्रीय महिला आयोगाने आपल्या ताज्या अहवालात म्हटले आहे.

(1) बेरोजगारी व हिंसा (2) हिंसा व उपासमार

(3) उपासमार व दारिद्र्य (4) बेरोजगारी व कुटुंब विघटन

---

**92.** शासनाच्या 'व्यय अग्रक्रम' समितीमध्ये खालीलपैकी कोणाचा समावेश नाही ?

(1) मुख्यमंत्री (2) वित्त मंत्री (3) मुख्य सचिव (4) वित्त सचिव

---

**93.** संदेशवहनाची प्रक्रिया विशिष्ट पायऱ्यांनीच होते असे मानले तर त्यासाठी प्रथम ..........

(1) प्रेषकाकडून त्याचे सांकेतीकरण व्हावे लागते.

(2) ग्राहकांकडून त्याचे सांकेतीकरण व्हावे लागते.

(3) प्रेषकाकडून उचित माध्यमाद्वारे त्याचे सांकेतीकरण व्हावे लागते.

(4) ग्राहकाकडून उचित माध्यमांद्वारे त्याचे सांकेतीकरण व्हावे लागते.

---

**94.** 1953 साली नेमण्यात आलेल्या राज्य पुनर्रचना आयोगाचे अध्यक्ष कोण होते ?

(1) पं. जवाहरलाल नेहरु (2) न्या. एस.के. दार

(3) न्या. फाजल अली (4) सरदार के.एम. पण्णिकर

---

**95.** फोर्ब्सच्या (सप्टेंबर 2009) सर्वेक्षणानुसार __________ हा भारतातील सर्वात श्रीमंत आतंरराष्ट्रीय क्रिकेट खेळाडू आहे.

(1) सचिन तेंडूलकर (2) युवराज सिंग (3) एम.एस. धोनी (4) जहिर खान

---

**96.** प्रश्नचिन्हाजागी योग्य पर्याय निवडा.

DEF : 654 : : GHI : **?**

(1) 789 (2) 987 (3) 978 (4) 678

---

**कच्च्या कामासाठी जागा**



www.StudentBounty.com

StudentBounty.com



**97.** बॉडी मास इंडेक्स (BMI) मोजण्याचे सूत्र __________ आहे.

(1) वजन (किलोग्राम)/उंची (सें.मी.)

(2) वजन (किलोग्राम)/ उंची$^2$ (मीटर)

(3) उंची (मीटर)/वजन (किलोग्राम)

(4) उंची (मीटर)/वजन$^2$ (किलोग्राम)

---

**98.** राज्य शासनाने आर्थिक शिस्त व सुयोग्य नियंत्रण येण्याच्या दृष्टीने सर्व विभागामध्ये संगणकीय बी.डी.एस. विकसित केले आहे, बी.डी.एस. म्हणजे काय ?

(1) बजेट डिस्ट्रीब्यूशन स्कीम


(2) बजेट डिसबर्समेंट स्कीम

(3) बजेट डिसबर्समेंट सिस्टीम

(4) बजेट डिस्ट्रीब्यूशन सिस्टीम

---

**99.** आकृतीचे निरीक्षण करुन प्रश्नचिन्हाच्या जागी योग्य संख्या लिहा.




(1) 3

(2) 7

(3) 9

(4) 8

---

**100.** शून्य परिकल्पनेचा त्याग केव्हा केला जाईल ?

(1) .05 स्तरावर CR ची किंमत 1.96 किंवा 1.96 पेक्षा अधिक मिळाल्यास.

(2) .05 स्तरावर CR ची किंमत 1.96 किंवा 1.96 पेक्षा कमी मिळाल्यास.

(3) .01 स्तरावर CR ची किंमत 2.58 किंवा 2.58 पेक्षा कमी मिळाल्यास.

(4) सांगता येत नाही.

---

**101.** एका रांगेत लतिफ उजवीकडून अकराव्या क्रमांकावर उभा असून त्याच्या डावीकडील पाच मुलांनंतर उभ्या असलेल्या सुनिलचा क्रमांक डावीकडून सोळावा आहे.  तर रांगेत एकूण किती मुले उभी आहेत.

(1) 30

(2) 31

(3) 32

(4) 33

---

**कच्च्या कामासाठी जागा**

www.StudentBounty.com

StudentBounty.com

**102.** ओझोन वायूचे मोजमाप __________ या एककात केले जाते.

(1) डॉबसन (2) सॉबसन (3) ओझोनमीटर (4) ओझोन इंटेन्सिफार

**103.** उचित पर्याय निवडा.

पर्यावरणाचा तोल बिघडण्याचे कारण म्हणजे ..........

(1) विकासाच्या नावाखाली नैसर्गिक संपदेचा केला जाणारा अनिर्बंध वापर.

(2) प्रगत राष्ट्रांकडून केला जाणारा विकसनशील देशांच्या साधनसंपत्तीचा गैरवापर.

(3) काही देशांच्या लोक संख्यावाढीमुळे त्यांच्या नैसर्गिक साधनसंपत्तीवर पडणारा गैरवाजवी ताण.

(4) वरील सर्व.

**104.** संप्रेषण प्रक्रियेत प्रेषकाच्या कार्याचा योग्य क्रम निवडा.

(1) माध्यमाची निवड, सांकेतिकीकरण, माहितीचे संकलन, माहितीचे सुसूत्रिकरण.

(2) माहितीचे संकलन, माहितीचे सुसूत्रिकरण, सांकेतिकीकरण, माध्यमाची निवड.

(3) माहितीचे संकलन, सांकेतिकीकरण, माहितीचे सुसूत्रिकरण, माध्यमाची निवड.

(4) माहितीचे संकलन, माहितीचे सुसूत्रिकरण, माध्यमाची निवड, सांकेतिकीकरण.

**105.** व्यक्तिमत्वाच्या सुप्त व अबोधमनात दडलेल्या या प्रवृत्तींचा, दडपल्या गेलेल्या इच्छा वासनांचा शोध घेण्यासाठी कोणत्या मूल्यमापन पद्धतीचा उपयोग करतात ?

(1) पडताळासूची (2) प्रासंगिक नोंदी (3) पदनिश्चयन श्रेणी (4) प्रक्षेपण पद्धति

**106.** राष्ट्रीय शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषदेची खालीलपैकी उद्दिष्टे कोणती ?

(1) प्रगत प्रशिक्षणाचे आयोजन करणे (2) ज्ञान प्रसार करणे

(3) शैक्षणिक समस्यांचे निराकरण करणे (4) वरील सर्व

**107.** जठरामध्ये स्त्रवणारे पेप्सिन आहारातील __________ या पोषकतत्वाचे पचन करते.

(1) प्रथिने (2) स्निग्धे (3) कर्बोदके (4) जीवनसत्वे

कच्च्या कामासाठी जागा



www.StudentBounty.com

StudentBounty.com



**108.** 'जी 20' सम्मेलन 2009 मध्ये कोणत्या ठिकाणी झाले ?

(1) लंडन (2) न्यूयार्क (3) सिडनी (4) दिल्ली

---

**109.** उचित पर्याय निवडा.

एखादा विशिष्ट गुणांक विस्तार दिला तर त्यात किती प्राप्तांक येतील; एखादा विशिष्ट प्राप्तांक दिला तर त्यापेक्षा जास्त किंवा कमी गुण मिळविणाऱ्यांची संख्या किती; या प्रश्नांची उत्तरे देण्यासाठी पुढीलपैकी कशाचा उपयोग होतो ?

(1) प्रमाण विचालन (2) प्रसामान्य संभवता वक्र

(3) सरासरी विचलन (4) स्तंभालेख

---

**110.** जर GORILA म्हणजे MONKEY तर MONEY = **?**

(1) ROIKA (2) GORLA (3) RLAOG (4) OGRAL

---

**111.** महाराष्ट्र शासनाने 'ग्राम न्यायालय कायदा-2008' हा कधी लागू केला ?

(1) 3 ऑक्टोबर, 2008 (2) 2 ऑक्टोबर, 2009 (3) 1 मे, 2008 (4) 3 मे, 2009

---


**112.** कोणत्या मराठी चित्रपटास 2009 चा प्रादेशिक उत्कृष्ट चित्रपट पुरस्कार प्राप्त झाला ?


(1) श्वास (2) निरोप (3) नटरंग (4) टिंग्या


---


**113.** पुढील पर्यायातील कोणती वेन आकृती दिलेल्या घटकांतील सहसंबध अचूकपणे दर्शवते.

डॉक्टर, परिचारिका, माणूस

(1) 

(2) 

(3) 

(4) 

---

कच्च्या कामासाठी जागा

www.StudentBounty.com

StudentBounty.com

**114.**

| | | |
|---|---|---|
| 82 | **?** | 5 |
| 2 | 17 | 65 |
| 50 | 37 | 26 |

सोबतच्या चौरसात 9 चौकोन आहेत; विशिष्ट सुत्रानुसार त्यापैकी 8 चौकोनात काही संख्या लिहीलेल्या आहेत. यानुसार प्रश्नचिन्ह असलेल्या चौकटीत दिलेल्या पर्यायांपैकी कोणती संख्या असेल ?

(1) 10 (2) 15 (3) 20 (4) 25

---

**115.** पुढील अंक मालिकेसाठी प्रश्नचिन्हाचे जागी योग्य पर्याय निवडा.

6, 8, 12, 14, 18, 20, **?**

(1) 22 (2) 26 (3) 24 (4) 30

---

**116.** संविधानातील 15 व्या कलमातील तरतुदी लागू करता याव्यात म्हणून केंद्र सरकारने ''अस्पृश्यता अपराध अधिनियम'' मंजूर केला आणि तो कायद्याच्या स्वरूपात 1 जून __________ पासून लागू करण्यात आला.

(1) 1948 (2) 1955 (3) 1950 (4) 1949

---

**117.** जे काही समजले, पटले, स्वीकारले किंवा कितीचे सात्मीकरण झाले या बद्दल प्रतिसाद शिक्षकापर्यंत पोहचवणे म्हणजे__________ होय.

(1) प्रसारण (2) ग्रहण (3) प्रत्याभरण (4) आकलन

---

**118.** 2009 सालचा मिस वर्ल्ड पुरस्कार विजेती कायने अलोरिनो ही कोणत्या देशाची आहे ?

(1) ब्राझील (2) जिब्रास्टर (3) व्हिएतनाम (4) पेरू

---

**119.** जास्तीत जास्त योग्य पर्याय निवडा.

विद्यार्थ्याला विशिष्ट ज्ञान वा कौशल्य प्राप्त करायला मदत देण्याचा विद्यार्थीकेंद्री ज्ञानरचनामार्ग कोणता ?

(1) ते कौशल्य तज्ज्ञांमार्फत त्याच्यासमोर दाखवून संबंधित कृती आठवून लिहायला सांगणे.

(2) त्या कौशल्याची चित्रफित दाखवून तशी कृती कराय्रला लावणे.

(3) ते कौशल्य काम करता करता आत्मसात व्हावे या दृष्टीने दैनंदिन जीवनाशी निगडीत कार्य-समस्या विद्यार्थ्यांवर सोपवणे.

(4) विद्यार्थ्यांना ते कौशल्य पूर्णपणे समजेपर्यंत समजावून सांगणे.

---

**कच्च्या कामासाठी जागा**



www.StudentBounty.com

StudentBounty.com



120. काकासाहेब कालेलकर यांच्या अध्यक्षतेखालील ''कालेलकर कमिशन'' कशाशी संबंधित आहे ?

(1) पंचायत राज सुधारणा निकष ठरविण्यासाठी

(2) प्रशासकीय सुधारणा निकष ठरविण्यासाठी

(3) आर्थिक सुधारणा निकष ठरविण्यासाठी

(4) मागासलेपणा सुधारणा निकष ठरविण्यासाठी

---

121. वृद्धावस्था ही व्याधी नाही पण वृद्धावस्थेच्या अनुषंगाने अनेक __________ उद्‌भवलेल्या दिसतात.

(1) चिंता (2) जवाबदाऱ्या (3) व्याधी (4) दशा

---

122. एका गावात एकूण 120 कुटुंबे आहेत. त्या गावात एकूण 55 परित्यक्ता आहेत. परित्यक्ता असलेल्या कुटुंबांपैकी तीन कुटुंबांत प्रत्येकी तीन, आठ कुटुंबात प्रत्येकी दोन तर उर्वरित कुटुंबात प्रत्येकी एक परित्यक्ता आहे तर एकूण किती कुटुंबांमध्ये एकही परित्यक्ता नाही ?

(1) 65 (2) 79 (3) 54 (4) 90

---

123. भारतातील विद्यार्थ्यांवर __________ या देशात अधिक हल्ले झाल्याचे निदर्शनास आले आहे.

(1) इंग्लड (2) अमेरीका (3) जर्मनी (4) ऑस्ट्रेलिया

---

124. लता मंगेशकर यांना 'ऑफिसर ऑफ द लिजण्ड ऑफ ऑनर' हा सर्वोच्च नागरी सन्मान कोणत्या देशाने दिला ?

(1) रशिया (2) इंग्लड (3) फ्रान्स (4) स्विडन

---

125. विसंगत पद ओळखा

1, 4, 9, 16, 27, 36

(1) 09 (2) 16 (3) 27 (4) 36

---

126. बालमजूर (प्रतिबंध व नियमन) कायदा 1986 नुसार __________ वर्षाखालील मुला-मुलींना विविध उद्योग धंद्यामध्ये काम करण्यास प्रतिबंध करण्यात आला आहे.

(1) 12 वर्षाखालील (2) 14 वर्षाखालील (3) 16 वर्षाखालील (4) 18 वर्षाखालील

---

**कच्च्या कामासाठी जागा**

www.StudentBounty.com

StudentBounty.com

**127.** महाराष्ट्र शासनाच्या प्रत्येक कार्यालय किंवा विभाग हे कोणत्या अधिनियमाखाली नागरीकांची सनद प्रसिद्ध करतात ?

(1) माहितीचा अधिकार अधिनियम, 2005

(2) महाराष्ट्र सार्वजनिक अभिलेख अधिनियम, 2005

(3) कौटुंबिक हिंसाचारापासून महिलांचे संरक्षण अधिनियम, 2005

(4) महाराष्ट्र शासकीय कर्मचाऱ्यांच्या बदल्यांचे विनियमन आणि शासकीय कर्तव्ये पार पाडताना होणाऱ्या विलंबास प्रतिबंध अधिनियम, 2005.

---

**128.** जास्तीत जास्त योग्य पर्याय निवडा.

गुंडाळ फलकांच्या वा अन्य फलकांच्या तुलनेत पॉवरपॉईंट सादरीकरण उपयुक्त ठरते कारण .....

(1) विषयसाहित्य प्रभावीपणे ग्राहकापर्यंत पोहोचते.

(2) शाब्दिक संप्रेषणादरम्यानच्या त्रुटी दूर करण्याच्या दृष्टीने आरेखने व चलच्चित्रमालिकांचा काही प्रमाणात उपयोग होतो.

(3) ग्राहकांना माहिती लक्षात ठेवणे सुलभ होते.

(4) रंगीत आरेखने व चलच्चित्रमालिका यांच्या मदतीने ग्राहकांचे अवधान खिळवून ठेवता येते.

---

**129.** संसद व विधीमंडळामध्ये महिलांना आरक्षणाची तरतूद करणारे विधेयक 'विशेष संयुक्त समिती' कडे 1996 साली सोपवण्यात आले होते. त्या समितीचे अध्यक्षपद भारतीय कम्युनिस्ट पक्षाच्या खालीलपैकी कोणा खासदाराकडे होते ?

(1) कॉ. इंद्रजित गुप्ता  (2) कॉ. अमरजित कौर

(3) कॉ. गुरुदास दासगुप्ता  (4) कॉ. गीता मुखर्जी

---

**130.** सहउद्बोधनाची कल्पना __________ यांनी मांडली.

(1) वॉरन विव्हर  (2) प्रो. शॅनॉन  (3) फिलिप लेविस  (4) थिओडोर एम. न्यूकोम

---

**131.** तरूण निरोगी व्यक्तीचा सामान्य रक्तदाब __________ असतो.

(1) 160/90  (2) 100/70  (3) 120/80  (4) 135/75

---

कच्च्या कामासाठी जागा

P.T.O.

www.StudentBounty.com

StudentBounty.com

**132.** वाक्यपूर्तीसाठी उचित पर्याय निवडा.

समूह संप्रेषण प्रभावी झाले असे तेव्हाच म्हणता येईल जेव्हा ;

(1) सर्व समूह सदस्य संबंधित संदेश यथातथ्य आठवू शकतील.

(2) निश्चित केलेल्या टक्केवारीइतके वा त्याहून अधिक समूह सदस्य संबंधित संदेश यथातथ्य आठवू शकतील.

(3) सर्व समूह सदस्य संदेशाद्वारे अपेक्षित वर्तन बदल दाखवतील.

(4) अपेक्षित टक्केवारीइतके वा त्याहून अधिक समूह सदस्य अपेक्षित वर्तनबदल दाखवतील.

---

**133.** लहान गटातील चर्चेसाठी __________ पद्धती उपयुक्त ठरते.

(1) चर्चासत्र (2) परिसंवाद (3) बुद्धिमंथन (4) पथक चर्चा

---

**134.** शिक्षणमंत्री व शिक्षण संचालक यांच्यातील दुवा __________ .

(1) अध्यक्ष (2) सचिव

(3) शिक्षणाधिकारी (4) मुख्य कार्यकारी अधिकारी

---

**135.** माझ्याजवळ तीन टोपल्या असून त्यात चिकू, पेरू, मोसंबी व संत्री आहेत. दुसऱ्या टोपलीत जितक्या प्रकारची फळे आहेत तितक्याच प्रकारची फळे पहिल्या टोपलीत आहेत. दुसऱ्या टोपलीत असलेला एक प्रकार पहिल्या टोपलीत नाही. तिसऱ्या टोपलीत एकाच प्रकारची फळे असून तो प्रकार पहिल्या दोन टोपल्यांत नाही. कोणत्या दोन टोपल्यातील फळे एकत्र केल्यास त्यात तीनपेक्षा अधिक प्रकारची फळे असतील ?

(1) पहिली व दुसरी टोपली एकत्र केल्यास त्यात तीन प्रकारची फळे असतील.

(2) दुसरी व तिसरी टोपली एकत्र केल्यास त्यात तीन प्रकारची फळे असतील.

(3) कोणत्याही दोन टोपल्यातील फळे एकत्र करुन तीनपेक्षा अधिक प्रकारची फळे मिळणार नाहीत.

(4) पहिली व तिसरी टोपली एकत्र केल्यास त्यात तीन प्रकारची फळे असतील.

---

**136.** भारतात कौटुंबिक छळापासून स्त्रीच्या संरक्षणाचा कायदा केव्हापासून अंमलात आला ?

(1) 2006 (2) 2005 (3) 2007 (4) 2008

---

**कच्च्या कामासाठी जागा**

www.StudentBounty.com

StudentBounty.com

**137.** भारतीय राज्यघटनेच्या ________ व्या कलमात दुरुस्ती करुन "शिक्षणाचा हक्क" हा मूलभूत हक्क म्हणून समाविष्ट करण्यात आलेला आहे.

(1) 15 (2) 16 (3) 21 (4) 24

---

**138.** शिक्षकांनी मुख्याध्यापकांना दिलेला अभिप्राय, हे ________ संप्रेषण होय.

(1) उर्ध्वगामी (2) समस्त (3) अधोगामी (4) वरीलपैकी कोणतेही नाही

---

**139.** पुढीलपैकी कोणती बाब लोकसंख्यावाढीला जबाबदार ***नाही***?

(1) लोकांमध्ये अज्ञान (2) लोक शिक्षित झाले

(3) आरोग्याच्या सोयी उपलब्ध (4) पुरुष प्रधान संस्कृति

---

**140.** जास्तीत जास्त उचित पर्याय निवडा.

संप्रेषण प्रक्रिया अपेक्षेप्रमाणे होते वा नाही याची चाचपणी करण्याचा उत्तम मार्ग म्हणजे .....

(1) विद्यार्थ्याला संदेशाची पुनरावृत्ती करायला लावणे.

(2) विद्यार्थ्याला तो करत असलेली विसांकेतीकरण प्रक्रिया मोठ्याने बोलून दाखवण्यास सांगणे.

(3) विद्यार्थ्याला संदेशाधारित प्रक्रिया करायला लावून त्याची कारणमीमांसा मोठ्याने बोलून दाखवण्यास सांगणे.

(4) वरीलपैकी एकही योग्य नाही.

---

**141.** अनू, मधू, काशी व जाई यांची घरे माझ्या घरापासून 5 किलोमीटर अनुक्रमे वायव्य, ईशान्य, आग्नेय व नैऋत्य दिशांना आहेत. जर मधूला काशीकडे जायचे असेल तर त्याने स्वत:च्या घराच्या संदर्भात कोणत्या दिशेने जायला हवे?

(1) पूर्व (2) पश्चिम (3) उत्तर (4) दक्षिण

---

**142.** महाराष्ट्र शासकीय कर्मचाऱ्यांच्या बदल्यांचे विनियमन आणि शासकीय कर्तव्ये पार पाडताना होणाऱ्या विलंबास प्रतिबंध अधिनियम, 2005 मधील तरतूदीनुसार प्रत्येक कार्यालयाचा किंवा विभागाचा प्रमुख, त्या कार्यालयाशी किंवा विभागाशी संबंधित सर्व बाबीवर अंतिम निर्णय घेण्याच्या दृष्टीने अधिकाऱ्यांचे किती स्तर निर्धारीन केले आहेत.

(1) दोन (2) तीन (3) पाच (4) सहा

---

**कच्च्या कामासाठी जागा**



www.StudentBounty.com

StudentBounty.com



**143.** पुढीलपैकी कोणती किंमत इतर तीन किंमतींशी सुसंगत नाही ?

(1) $\frac{56}{136}$ (2) $\frac{70}{153}$ (3) $\frac{77}{187}$ (4) $\frac{49}{119}$

---

**144.** व्यक्तीच्या विकासाचे तत्व हे ________ आहे.

(1) विकासाचा विशिष्ट क्रम व दिशा (2) आकारमानातील बदल

(3) प्रमाणातील बदल (4) रचनात्मक वाढ व विकास

---

**145.** राकेश व मुकेश यांची भाषिक कौशल्ये उच्च पातळीची आहेत. दिनेश व राजेश यांची भाषिक पातळी निम्न आहे. मुकेश व दिनेश लेखी परीक्षांचा सतत सराव करतात. या चार मुलांपैकी कोणता विद्यार्थी परीक्षेत उत्तीर्ण होण्याची शक्यता सर्वात अधिक आहे ?

(1) राकेश (2) मुकेश (3) दिनेश (4) राजेश

---

**146.** प्रक्रिया करुन उपयुक्त केलेल्या डाटाच्या संचाला ________ म्हणतात.

(1) डेटा (2) माहिती (3) तंत्रज्ञान (4) मॉडेम

---


**147.** रिकाम्या जागी कोणता अक्षर समूह येईल ?



BCDB, CDEC, DEFD, EFGE, _____ **?**


(1) FGHF (2) EFGI (3) FGHI (4) EFGD

---

**148.** पुढील आकृती दाखवल्यानुसार भिंतीच्या पृष्ठाला चिकटविली आहे. तर कोणता पर्याय तिचे भिंतीतील प्रतिबिंब आहे ?



(1)  (2) 

(3)  (4) यापैकी कोणताही नाही

---

**कच्च्या कामासाठी जागा**

www.StudentBounty.com

StudentBounty.com

149. वेब पेज तयार करण्यासाठी ________ भाषा वापरतात.

(1) HTML (2) BASIC (3) COBOL (4) FORTRAN

---

150. ठराविक चाकोरीतून शासनाच्या ध्येय-धोरणानुसार दिले जाणारे शिक्षण म्हणजे________ .

(1) औपचारिक शिक्षण (2) अनौपचारिक शिक्षण (3) दूर शिक्षण (4) सहज शिक्षण

---

- o 0 o -

**कच्च्या कामासाठी जागा**

P.T.O.

www.StudentBounty.com

StudentBounty.com

## सूचना – ( पृष्ठ 1 वरुन पुढे.... )

(9) सदर प्रश्नपत्रिकेसाठी आयोगाने विहित केलेली वेळ संपल्यानंतर उमेदवाराला ही प्रश्नपुस्तिका स्वत: बरोबर परीक्षाकक्षाबाहेर घेऊन जाण्यास परवानगी आहे. **मात्र परीक्षाकक्षाबाहेर जाण्यापूर्वी उमेदवाराने आपल्या उत्तरपत्रिकेचा भाग-1 समवेक्षकाकडे न विसरता परत करणे आवश्यक आहे.**

---

## नमुना प्रश्न

प्रश्न.क्र. **101.** आधुनिक विचारसरणीनुसार शिक्षणाच्या प्रक्रियेतील केंद्रबिंदु कोण ?

(1) शिक्षण संस्था (2) शिक्षक

(3) विद्यार्थी (4) अभ्यासक्रम

ह्या प्रश्नाचे योग्य उत्तर "(3) विद्यार्थी" असे आहे. त्यामुळे या प्रश्नाचे उत्तर "(3)" होईल. यास्तव खालीलप्रमाणे प्र.क्र. 101 समोरील उत्तर-क्रमांक "③" हे कंस पूर्णपणे छायांकित करुन दाखविणे आवश्यक आहे.

प्र.क्र. **101.** ① ② ● ④

अशा पद्धतीने प्रस्तुत प्रश्नपुस्तिकेतील प्रत्येक प्रश्नाचा तुमचा उत्तरक्रमांक हा तुम्हाला स्वतंत्ररीत्या पुरविलेल्या उत्तरपत्रिकेवरील त्या त्या प्रश्नक्रमांकासमोरील संबंधित वर्तुळ पूर्णपणे छायांकित करून दाखवावा. **ह्याकरिता फक्त काळ्या शाईचे बॉलपेन वापरावे. पेन्सिल वा शाईचे पेन वापरू नये.**

---

**कच्च्या कामासाठी जागा / SPACE FOR ROUGH WORK**

www.StudentBounty.com